# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ७० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२० जानेवारी, २०१५ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ७० वी बैठक मंगळवार, दि.२० जानेवारी, २०१५ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. घुटे व्ही. बी. | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ५) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १०) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| ११) | श्री. पाटील बी. पी. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १२) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १३) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. यांनी पत्राद्वारे व डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर., डॉ. करचे बी. आर. व सौ. मोहिते-पाटील पी. पी. यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. प्रा. डॉ. पाटील टी. आर., अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी व विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण), सोलापूर विभाग हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] दि.२३ डिसेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव: दि.२३ डिसेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून खालील दुरुस्तीसह सर्वानुमते कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

| पान क्र. ९ वरील मूळ ठराव क्र.९ : |
|---|
| विद्यापीठाकडून आयोजित होणाऱ्या विविध बैठकांकरिता उपस्थित राहण्यासाठी एका सदस्यास कार वापरण्यास परवानगी देण्यास आणि प्रवासाच्या प्रति किलोमीटर नुसार देयक आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| **पान क्र. ९ वरील दुरुस्त करावयाचा ठराव क्र.९ :** |
| विद्यापीठाच्या पी. जी. बी. यु. टी. आर. विभागाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या विविध बैठकांकरिता उपस्थित राहण्यासाठी एक सदस्य / सदस्या जरी कारने आला / आली तरी त्यांना कार वापरण्यास परवानगी देण्यास आणि प्रवासाच्या प्रति किलोमीटर नुसार देयक आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

२) पान क्र.१८ वर Business Economics अभ्यासमंडळासमोर B.Com. अभ्यासक्रमात "Mathematics" या विषयाचा समावेश करण्यात आला.

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठरावः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ]** **दिनांक ३०/१२/२०१४ रोजी संपन्न झालेल्या 'विशेष कक्ष स्थायी समितीच्या' बैठकीचा कार्यवृत्तांत माहितीस्तव सादर.**

(टिपणीः विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी व त्यांना नियमानुसार असलेल्या विशेष सवलती योग्य प्रकारे उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या 'विशेष कक्ष स्थायी समितीची बैठक दिनांक ३०/१२/२०१४ रोजी संपन्न झाली.

सदर बैठकीचा कार्यवृत्तांत शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र. १५८ १ (ii) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवणे आवश्यक आहे.

सबब, उक्तप्रमाणे 'विशेष कक्ष स्थायी समिती' बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठरावः** **दिनांक ३०/१२/२०१४ रोजी संपन्न झालेल्या विशेष कक्ष स्थायी समिती बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ] अध्यादेश क्र.१५८(२.१) मधील तरतुदीनुसार "विशेष कक्ष स्थायी समिती" मधील सदस्यांच्या नामनिर्देशनाची बाब विचारार्थ सादर.**

(टिपणी: विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी व त्यांना नियमानुसार असलेल्या विशेष सवलती योग्य प्रकारे उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयासाठी विद्यापीठात "विशेष कक्ष स्थायी समितीचे" गठण होणे आवश्यक आहे.

सदर समितीचे गठण अध्यादेश क्र.१५८(२.१) मधील तरतुदीनुसार तीन वर्षासाठी करावयाची असून, मागील दि.०१/०१/२०१२ ते ३१/१२/२०१४ अन्वये गठित करण्यात आलेल्या समितीची मुदत दि.३१/१२/२०१४ रोजी संपल्याने, नव्याने दि.०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०१७ या तीन वर्षासाठी विशेष कक्ष स्थायी समिती गठित करावी लागणार आहे.

**अध्यादेश क्र.१५८ (२.१)** प्रमाणे समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| i. | The Vice-Chancellor | Ex-Office-Chairman |
| ii. | 2-3 Professors | Members |
| iii. | 3-5 Principals | Members |
| iv. | 1-2 Readers | Members |
| v. | 1-2 Lecturers | Members |
| vi. | 2 women representative from teaching and non-teaching category | Members |
| vii. | A representative of the State. Govt. | Member |
| viii. | The Deputy Registrar (Spl. Cell) | Member - Secretory |

The members at Serial Nos. ii to vi are to be nominated by the Management Council. Tenure: The tenure of members at Sr. No. ii to vi shall be three years.

उक्तप्रमाणे विशेष कक्ष स्थायी समिती गठित करणेसाठी अनुक्रमे ii to vi मधील सदस्यांचे नामनिर्देशन व्यवस्थापन परिषदेने करावयाचे असल्याने, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ ठेवणे आवश्यक आहे.

सबब, उक्तप्रमाणे दि.०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०१७ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी विशेष कक्ष स्थायी समिती गठित करणेसाठी अनुक्रमे ii to vi बाबत नामनिर्देशनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: अध्यादेश क्र.१५८(२.१) मधील तरतुदीनुसार "विशेष कक्ष स्थायी समिती" मधील सदस्यांचे खालीलप्रमाणे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

| | | |
|---|---|---|
| **Ii)** | **2-3 Professors** | **1) Prof. Dr. S. S. Surywanshi**<br>**2) Prof. Dr. E. N. Ashokkumar** |
| **iii)** | **3-5 Principals** | **1) Prin. Shri. S. K. Pawar**<br>**2) Prin. Dr. B. V. Choudhary**<br>**3) Prin. Dr. R. N. Shendge** |
| **iv)** | **1-2 Readers** | **1) Dr. B. R. Karche**<br>**2) Dr. M. S. Deshmukh** |
| **v)** | **1-2 Lecturers** | **1) Shri. S. D. Raut** |
| **vi)** | **2 women representative from teaching and non teaching category** | **1) Dr. Smt. Rekha M. Ohol**<br>**2) Smt. J. K. Kokane** |

**[ ०५ ] सचिव, सोलापूर विद्यापीठ अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटना, सोलापूर यांचे महाविद्यालयीन कामकाजाचे सुव्यवस्थित व विनाविलंब कार्यवाही करीता काही बँक खाती प्राचार्यांच्या सहीने चालविण्यास परवानगीबाबतचे प्राप्त झालेले पत्र विचारार्थ.**

टिपणी: मा. सचिव, सोलापूर विद्यापीठ अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटना, सोलापूर यांनी दि.२३/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रचलित नियमाप्रमाणे सद्या विद्यार्थ्यांचे विवीध प्रकारचे शुल्क ज्या विवीध खात्यावर जमा होते ती सर्व खाती संस्थाचालक व प्राचार्य यांच्या संयुक्त स्वाक्षरीने चालवली जातात, पण बरीचशी खाती संयुक्त स्वाक्षरीने चालविणे प्रशासकीय दृष्टीने गैरसोयीचे ठरते व विद्यापीठाचे विविध देय शुल्क भरताना नाहक विलंब होतो तरी गैरसोय टाळण्यासाठी खालील शुल्का संबधीची बँक खाती फक्त प्राचार्यांच्या स्वाक्षरीने चालविण्यास मान्यता मागितलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | युवक महोत्सव | २. | प्रो-रेटा |
| ३. | महा क्रिडा महोत्सव | ४. | पात्रता शुल्क |
| ५. | आपत्ती शुल्क | ६. | विद्यापीठ विकास निधी |
| ७. | ई-सुविधा शुल्क | ८. | विद्यार्थी विमा |
| ९. | ग्रंथालय शुल्क | १०. | जिमखाना शुल्क |
| ११. | विद्यापीठ परीक्षा शुल्क | १२. | नियतकालिक शुल्क |
| १३. | पर्यावरण शुल्क | १४. | पात्रता फॉर्म शुल्क |

संस्थेची नोंदणी / कामकाज / लेखा परिक्षण इत्यादी बाबी पब्लीक ट्रस्ट ॲक्ट नुसार धर्मादाय आयुक्त यांचेमार्फत नियंत्रित करण्यात येतात. महाविद्यालय हे संस्थेचे घटक असल्याने बँकेचा व्यवहार कोणाच्या सहीने संचलित करावा ही बाब संस्थेच्या व मा.धर्मादाय आयुक्त यांच्या आखत्यारीत येते असे कार्यालयाचे मत आहे.

सबब, सचिव, सोलापूर विद्यापीठ अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटना, सोलापूर यांचे महाविद्यालयीन कामकाजाचे सुव्यवस्थित व विनाविलंब कार्यवाही करीता काही बँक खाती प्राचार्यांच्या सहीने चालविण्यास परवानगीबाबतचे प्राप्त झालेले पत्र विचारार्थ).

**ठराव: विद्यापीठात जमा करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे शुल्क प्राचार्यांना वेळेत विद्यापीठात जमा करता यावेत याकरिता अ. क्र. १ ते १४ वरील शुल्क बँकेत जमा करणे व बँकेतून काढणे यासाठी आवश्यक नियमांची पूर्तता करुन प्राचार्यांच्या नावाने स्वतंत्र खाते उघडण्याबाबत संस्थेस कळवावे असे ठरले.**

## मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः

**[ ६ (१) ] शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून नियमित एम. एड. अभ्यासक्रमाचा कालावधी २ वर्षाचा करण्यात आला असल्यामुळे त्याकरीता अधिकच्या सर्व भौतिक सुविधांची पुर्तता करण्यास तयार असल्याबाबतचे Affidavit सादर करण्यास तातडीची बाब म्हणून म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाहीची बाब माहितीस्तव.**

(टिपणीः राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, मानस भवन, श्यामला हिल्स, भोपाल यांचे प्रतिज्ञालेख सादर करण्यासंदर्भात कळविलेल्या दि.२६/१२/२०१४ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. एआयसीटीई नियमावली-२०१४ नुसार एम. एड. अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून दोन वर्षाचा करण्यात आला असल्यामुळे त्याकरीता अधिकच्या सर्व भौतिक सुविधा निर्माण करण्यासंदर्भात Explanatory Note अन्वये मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच सर्व भौतिक सुविधेची पुर्तता करण्यास तयार असल्यासंदर्भात सादर करावे लागणारे रु.१००/- पेपरवरील Affidavit चा मसुदाही सदरच्या पत्रासोबत जोडला आहे.

यासंदर्भात मा.अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांनी, अन्य विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता यांच्याशी चर्चा केली असता विद्यापीठाने व त्यांच्या संलग्न असलेल्या महाविद्यालयातील प्राचार्यांनी Affidavit सादर केले आहे. त्यामुळे आपल्या विद्यापीठातील एम. एड. अभ्यासक्रमासंदर्भातही Affidavit सादर करण्यात यावे असे दि.९/१/२०१५ रोजी विद्यापीठास कळविले आहे.

National Council for Teacher Education (Recognition Norms and Procedure) Regulations, 2014 vide Notification No.346 dated 1.12.2014 नुसार सन २०१५-१६ पासून नियमित एम. एड. अभ्यासक्रमाचा कालावधी २ वर्षाचा केल्यामुळे त्यासाठी आवश्यक असलेल्या ज्या अधिकच्या भौतिक सुविधांची पुर्तता करावी लागणार आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. (अधिक तपशिलासाठी संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झालेली Explanatory Note ची प्रत जोडण्यात आली आहे).

| | |
|---|---|
| १ | प्रवेश क्षमता ४० वरुन ५० इतकी करण्यात आली आहे. |
| २ | सदरच्या अभ्यासक्रम १ वर्षाच्या ऐवजी २ वर्षाचा करण्यात आला आहे. |
| ३ | सदरचा अभ्यासक्रम दोन वर्षाचा केल्यामुळे इमारत, फर्निचर, प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालयातील पुस्तकात वाढ करणे इत्यादी भौतिक सुविधेमध्ये वाढ करावी लागणार आहे |
| ४ | त्याचप्रमाणे शिक्षकीय व शिक्षकेत्तर पदाच्या संख्यामध्ये देखील वाढ होणार आहे |
| ५ | एम.एड अभ्यासक्रमाबरोबरच इतर पुरक अभ्यासक्रम सुरु करावा लागणार आहे |
| ६ | यापुर्वी एम.एड अभ्यासक्रमासाठी रु.८.०० लाखाची मुदत ठेव ठेवण्यात आली होती. त्यामध्ये आत्ता वाढ झाली असू ती रु-१२.०० लाखाची करावी लागणार आहे. |

वरीलप्रमाणे सर्व भौतिक सुविधांची पुर्तता करण्यास तयार असल्यासंदर्भातील खालील नमुन्यातील Affidavit रु.१००/- स्टॅम्प पेपर तयार करुन ते दि.१४/१/२०१५ पर्यंत ए.आय. सी. टी. ई भोपाळ कार्यालयास पाठविणे आवश्यक असल्याने व व्यवस्थापन परिषदेची बैठक दि.२०/०१/२०१५ रोजी आयोजित केलेली असल्यामुळे मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मान्यता दिली आहे.

## Affidavit

1. **Shri. Shivsharan Mali** Son of **Shri.Kallppa Mali** Resident of **63 B Ashirvad Dr. Dwarkadas Kotanis Nagar Vijapur Road Solapur**. And **Registrar of Solapur University, Solapur** and that I have been authorized by the Management of the above mentioned institution to give this Affidavit on behalf of the institution, which at present offers **M.Ed**. course of **One year** duration (**File Code No.WRC/5-6/89/2006/C-11973)** with an annual intake of **40** It is further certified that the Management has studied the National Council for Teacher Education (Recognition Norms and Procedure) Regulations, 2014 carefully and has understood their implications for the existing Teacher Education Institutions offering NCTE recognized teacher education programme.

2. Further, I have been authorized by the Management to state that the institution shall fulfill the revised Norms relating to infrastructure, instructional facilities, enhanced amount of Endowment and Reserve Funds. Number and qualifications of Teaching Staff, Curriculum and implementation strategies, in view of the change in duration / intake of the programme offered in the institution within the time allowed by NCTE.

**(S.K.Mali)**
**Registrar**
**Solapur University,Solapur**

वरीलप्रमाणे मा. कुलगुरुमहोदयांनी तातडीची बाब म्हणून मान्यता दिल्याप्रमाणे संबंधित कार्यालयास दिनांक १३ जानेवारी, २०१५ Affidavit पाठवून दिले आहे.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची बाब माहितीस्तव).

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ६ (२) ] पदवीधर नोंदणीकरिता असणाऱ्या Appendix IV या अर्जाचे व नोंदणी शुल्क अनुक्रमे रु.५/- व रु.५०/- असे एकत्रित रु.५५/- वरुन एकत्रितपणे रु.१००/- तसेच पदवीधर मतदार नोंदणीकरिता असणाऱ्या Appendix V या अर्जाचे व नोंदणी शुल्क अनुक्रमे रु.५/- व रु.२०/- असे एकत्रित रु.२५/- वरुन एकत्रितपणे रु.५०/- करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी :- सध्याच्या अस्तित्वात असलेल्या अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद तसेच इतर अधिकारमंडळाची मुदत दि.३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपणार आहे. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम २५ (२) नुसार, अधिसभेवर निवडणूकीद्वारे भरावयाच्या जागेकरिता महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ९९ (५) नुसार नोंदणीकृत पदवीधर म्हणून करावयाच्या Appendix IV च्या अर्जाचे शुल्क रु.५/- व नोंदणी शुल्क रु.५०/- करण्यासाठी मा.कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४ (७) नुसार कार्यवाही केल्याची व्यवस्थापन परिषदेने दि.१०/०९/२००९ रोजीच्या बैठकीत विषय क्र.११ नुसार नोंद घेतली.

पदवीधर मतदार नोंदणी अर्जाचे शुल्क रु.५/- व नोंदणी शुल्क रु.२०/- असे एकत्रितपणे रु.२५/- आकारण्यास व्यवस्थापन परिषदेने दि.१०/०३/२०१० च्या बैठकीत विषय क्र.७ अन्वये मान्यता दिली.

नोंदणीकृत पदवीधर म्हणून करावयाच्या Appendix IV च्या अर्जाचे शुल्क रु.५/- व नोंदणी शुल्क रु.५०/- आणि पदवीधर मतदार नोंदणीसाठी करावयाच्या Appendix V च्या अर्जाचे शुल्क रु.५/- व मतदार नोंदणी शुल्क रु.२०/- या सर्व शुल्कामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

सबब, पदवीधर नोंदणीकरिता असणाऱ्या Appendix IV या अर्जाचे व नोंदणी शुल्क अनुक्रमे रु.५/- व रु.५०/- असे एकत्रित रु.५५/- वरुन एकत्रितपणे रु.१००/- तसेच पदवीधर मतदार नोंदणीकरिता असणाऱ्या Appendix V या अर्जाचे व नोंदणी शुल्क अनुक्रमे रु.५/- व रु.२०/- असे एकत्रित रु.२५/- वरुन एकत्रितपणे रु.५०/- करण्याची व सदर नोंदणी प्रक्रिया विद्यापीठाच्या गेल्यावर्षीच्या आणि यावर्षीच्या दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांची नाव नोंदणीचे काम केलेल्या M/s. Intellection Software & Technologies Pvt. Ltd., Pune संस्थेकडून प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रति नोंदणीसाठी रु.१५/- प्रमाणे काम करुन घेण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **पदवीधर नोंदणीकरिता असणाऱ्या Appendix IV या अर्जाचे व नोंदणी शुल्क अनुक्रमे रु.५/- व रु.५०/- असे एकत्रित रु.५५/- वरुन एकत्रितपणे रु.१००/- तसेच पदवीधर मतदार नोंदणीकरिता असणाऱ्या Appendix V या अर्जाचे व नोंदणी शुल्क अनुक्रमे रु.५/- व रु.२०/- असे एकत्रित रु.२५/- वरुन एकत्रितपणे रु.५०/- करण्यास व पदवीधर नोंदणी व पदवीधर मतदार नोंदणी प्रक्रियेचे M/s. Intellection Software & Technologies Pvt. Ltd., Pune या संस्थेकडून प्रति विद्यार्थी प्रति नोंदणीसाठी रु.१५/- प्रमाणे (पदवीधर नोंदणी व पदवीधर मतदार नोंदणी यासाठी एकूण रु.३०/-) + व्हॅट व सर्व्हिस टॅक्स सह काम करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ६ (३) ] विद्यापीठ परिसरातील विविध बांधकाम करणे या कामाकरिता दि.१९/०१/२०१५ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव सादर.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरात करावयाच्या विविध बांधकामाबाबत बांधकाम समितीची बैठक दि.१९/०१/२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत विषय क्र.०१ ते ०७ व आयत्या वेळेचा विषय क्र.८(१) ठेवण्यात आले असता ठरावानुसार व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस्तव शिफारस करण्यात आलेली आहे.

विद्यापीठ परिनियम S.339 (f) नुसार दि.१९/०१/२०१५ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठ परिसरातील विविध बांधकाम करणे या कामाकरिता दि.१९/०१/२०१५ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**